# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
## विभागीय मंडळ, पुणे.४११००५

## MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE.411005

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | E-MAIL - |
|---|---|---|
| 25536722 (OFFICE) | 25536781/82/83, 25536712 (OFFICE) | sscboardpune@gmail.com |


<u>महत्वाचे</u>

क्रमांक : पुविमं/डीपी/संलग्नता/ 5617
पुणे-४११००५
दिनांक :-०९/१०/२०२४

प्रति,
प्राचार्य ,
लेट.श्री.एकनाथ नामदेव गटकळ
इंग्लिश मिडीयम स्कूल, अँण्ड ज्यु कॉलेज टाकळीभान
ता. श्रीरामपूर जि.अहमदनगर.

विषय :- उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयास विभागीय मंडळ संलग्नता व तात्पुरता सांकेतांक क्रमांक देणेबाबत .....

संदर्भ :- १. आपला जा.क्र. समक्ष दि.१५/१०/२०२४ रोजीचा प्रस्ताव.
२. जाक्र.शिउसं/पुणे/उमा-४०५/२०२४/११७१३ दि.१५/१०/२०२४.
३. राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा-३/७४८९ दिनांक- ४ सप्टेंबर, २००६.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने व संदर्भानुसार आपल्या कनिष्ठ महाविद्यालयास फेब्रुवारी/मार्च २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी खालीलप्रमाणे तात्पुरती पुणे विभागीय मंडळ संलग्नता व सांकेतांक क्रमांक देण्यात येत आहे.

| इ.१२ वी | | अध्यापनाचे विषय | |
|---|---|---|---|
| शाखा व माध्यम- | मंडळ मान्यता सांकेतांक क्रमांक | १. इंग्रजी (०१) | ०७. आरोग्य व शारीरिकशिक्षण (३०) |
| विज्ञान- इंग्रजी माध्यम | J 12.14.034 | २. मराठी (०२) | ०८. पर्यावरण शास्त्र (३१) |
| | | ३. गणित व संख्याशास्त्र(४०) | |
| | | ४. भौतिकशास्त्र (५४) | |
| | | ५. रसायनशास्त्र (५५) | |
| | | ६. जीवशास्त्र (५६) | |

आपल्या कनिष्ठ महाविद्यालयास मार्च व जुलै परीक्षेसाठी खाली नमूद केल्यानुसार परीक्षा केंद्र निर्धारीत करण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| फेब्रु./मार्च परीक्षेसाठी | परीक्षा केंद्र क्रमांक :- २२७ |
| | परीक्षा केंद्राचे नाव :- कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अशोकनगर ता. श्रीरामपूर जि. अहमदनगर |
| जुलै परीक्षेसाठी | परीक्षा केंद्र क्रमांक :- २२१ |
| | परीक्षा केंद्राचे नाव :- के जे सोमय्या ज्यु कॉलेज श्रीरामपूर |

(कृ.मा.प.)

सदर निर्धारीत करण्यात आलेले परीक्षा केंद्र मार्च २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेसाठी सादर करण्यात येणाऱ्या ऑनलाईन आवेदनपत्रावर विहित ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे.

## पुढील सलग ०५ वर्षे नुतनीकरण करण्यात यावे.

विभागीय मंडळाकडून दिलेला तात्पुरता सांकेतांक क्रमांक कायम करण्यासाठी राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./ परीक्षा-३/७४८९ दि. ४ सप्टेंबर, २००६ नुसार आपल्या माध्यमिक शाळेला दिलेला तात्पुरता सांकेतांक क्रमांक वर्ष २०२५-२०२६ पासून शैक्षणिक वर्ष २०२९-२०३० पर्यंत प्रत्येक वर्षी त्या शैक्षणिक वर्षात १५ मे पर्यंत विहित नमुन्यात शुल्कासह प्रस्ताव सादर करून मंडळ मान्यता नूतनीकरण करून घेणे आवश्यक आहे.

मंडळ मान्यता नूतनीकरण प्रस्तावात विहीत नमुन्यातील फॉर्म, मंडळ मान्यता पत्राची छायांकीत प्रत व त्या त्या वर्षाकरीता शाळा तपासणी अहवाल (शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी यांचे शिफारशीसह) दि. १५ मे पर्यंत रू. १,०००/- शुल्कासह तद्नंतर दि. ३१ ऑगस्ट पर्यंत रू.१,६००/- (नूतनीकरण शुल्क व दंड) व त्यापुढे प्रत्येक महिन्यात रू. १००/- दंडात्मक शुल्क प्रस्ताव प्रत्यक्ष सादर करेपर्यंत भरावा लागेल.

वरील पद्धतीने व निर्धारीत कालावधीत नूतनीकरण घेतल्याशिवाय आगामी मार्च परीक्षेसाठी परीक्षा आवेदनपत्रे सादर करणे नियमबाह्य असेल, याची नोंद घ्यावी. सलग पाच वर्षे मंडळ मान्यता नूतनीकरण करून झाल्यानंतर सन २०२३-२०२४ साठी देण्यात आलेला तात्पुरता सांकेतांक क्रमांक कायम करण्याकरीता शिक्षण उपसंचालक, पुणे यांची शिफारशीसह प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करण्यात यावा.

**विभागीय मंडळाने दिलेली तात्पुरती मंडळ मान्यता खालील अटी / शर्तींचा भंग केल्यास आपोआप रद्द होईल.**

१. पुढील शैक्षणिक वर्षाकरीता मंडळ मान्यता नूतनीकरण न करता परीक्षा आवेदनपत्र भरल्यास.
२. परीक्षा कामकाजासाठी केंद्रसंचालक / दालन पर्यवेक्षक / परीक्षक / नियामक / मुख्य नियामक / प्राश्निक इ. मनुष्यबळ पुरविण्यासाठी नकार दिल्यास.
३. परीक्षा संचालनाकरीता माध्यमिक विद्यालयात उपलब्ध असलेल्या भौतिक सुविधा न पुरविल्यास.
४. विभागीय मंडळ सूचना किंवा आदेशाचे पालन न केल्यास.
५. शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर इ. १० वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थी संख्येनुसार नोंदणी शुल्क (रजिस्ट्रेशन फी) व शिक्षण संक्रमण फी १० ऑगस्ट पर्यंत मंडळास सादर न केल्यास.
६. परीक्षा संचालनामध्ये आपल्या शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांनी गैरमार्ग केल्यास.

(औदुबंर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे - ५

**प्रत माहीती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**

१. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
२. शिक्षणाधिकारी माध्य. , जिल्हा परीषद, अहमदनगर.
३. पुणे विभागीय मंडळातील सर्व शाखा प्रमुख.